# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/08/2023 (मंगळवार) सकाळ


### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दिनांक २९/०७/२०२३ चे दुपारी १३.३५ वा. दरम्यान जिल्हा वाहतुक शाखेचे पथक मोठा टोल नाक्याजवळ वाहतुक केसेस करत असताना गुप्त बातमीदारां मार्फत खबर मिळाली की, बोलेरो पिकअप क्रमांक MH-36/AA-2544 मध्ये अवैध्यरित्या जनावरांची वाहतूक करीत भंडारा कडुन चाफेगडी कडे येत आहे. अशा खबरेवरून मौजा माथनी ते चाफेगडी रोडवर स्टॉफच्या मदतीने नाकाबंदी करीत असतांना १४.३० वा. दरम्यान माथनीचे दिशेने एक बोलेरो पिकअप वाहन येतांनी दिसल्यावरून त्या बोलेरो पिकअप गाडीला हात दाखवुन थांबण्याचा ईशारा केला असता सदर बोलेरो पिकअप चालक **आरोपी नामे– १) आतिश किशोर बन्सोड, वय २३ वर्ष, रा. लावेश्वर ता. भंडारा जि. भंडारा २) अमन सुरेश मते, वय २० वर्ष, रा. टोयेपार ता. भंडारा जि. भंडारा** हे पोलीसांना ड्रेसवर पाहून वाहन तिथेच थांबवुन पळु लागले. त्याचा स्टाफच्या सहाय्याने पाठलाग करून त्यास पकडले व त्यास वाहनामध्ये काय आहे तु का पळतो असे विचारणा केली असता तो उडवा उडवीचे उत्तर देऊ लागला व वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये एकुण ०७ गोवंश जनावरे त्याची पाय व मुसके बांधुन त्यांना कुठल्याही प्रकारे हालचाल करता येणार नाही अशा प्रकारे एकावर एक रचुन प्राण्यांना वेदना होईल अशा प्रकारे अत्यंत क्रूरतेची वागणुक देत कत्तलीकरीता वाहुन नेतांना आढळुन आल्याने मोक्यावरून ०७ गोवंश बैल एकुण किंमती १,०५,०००/—रू व बोलेरो पिकअप वाहन क्रमांक MH-36/AA-2544 किंमती ६,५०,०००/—रू असा एकुण ७,५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून प्राण्यांच्या संरक्षण कामी त्यांना गोशाला येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने दाखल करण्यात आले असून सदर बोलेरो पिकअप पोलीस स्टेशन मौदा येथे दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस हवालदार रविन्द्र रुपचंद बर्वे, जिल्हा वाहतुक शाखा ना. ग्रा. यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम ५, ५(अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले, पोलीस उप अधिक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर यांचे मार्गदर्शनात चालक सहायक फौजदार सुधीर यादव, पोलीस हवालदार रविंद्र बर्वे, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार मनिष चव्हाण, कार्तिक पुरी यांनी केलेली आहे.



## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत खापरी (केने) एरंडा रोड ता. काटोल येथे दिनांक ३१/०७/२०२३ चे १७.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– मुकेश बळीराम चव्हान, वय २५ वर्ष, रा. खापरी केने ता. काटोल याला दि. ३१/०७/२०२३ रोजी सायंकाळी १७/३० वा. चे दरम्यान त्यांचे भाऊ नामे– धिरज चव्हाण याने फोन करून सांगीतले की मौजा एरंडा खापरी शिवारातील शेतात जयदेव जगदिश चंद्रावत व त्याचा भाऊ सागर जगदिश चंद्रावत यांनी पकडुन ठेवले व त्यांचे वडील जगदिश चंद्रावत यांनी त्याला कोणत्यातरी धारदार शस्त्राने पाठीवर, घाव मारून जखमी केले तेव्हा फिर्यादी हा जगदिश चंद्रावत यांचे शेतात गेला असता **आरोपी नामे– १) जगदिश बिरज चंद्रावत २) जयदेव जगदिश चंद्रावत ३) सागर जगदिश चंद्रावत सर्व रा. खापरी (केने) ता. काटोल** हे त्याचा भाऊ धिरज चव्हाण त्याचे मागे धावत होते फिर्यादी दिसताच तिघेही पळुन गेले. फिर्यादीने जखमीला विचारले असता जखमीने सांगीतले की, जयदेव जगदिश चंद्रावत व त्याचा भाऊ सागर जगदिश चंद्रावत यांनी पकडुन ठेवले व त्यांचे वडील जगदिश चंद्रावत यांनी त्याला कोणत्यातरी धारदार शस्त्राने जिवानीशी मारण्याच्या उद्देशाने पाठीवर, घाव मारून जखमी केले तेव्हा फिर्यादीने जखमीला काटोल ग्रामिण रूग्णालय काटोल येथे उपचाराकरीता नेले असता तेथील डॉक्टरांनी प्रथम उपचार करून नागपुर हॉस्पीटल येथे रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे मॅडम मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर